PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 5

# आव्हान शाळाबाह्य मुलांचे शिक्षणाचे

**प्रा. रमेश काशिराम शेंडे**
सहाय्यक प्राध्यापक
मातोश्री मुंदाफळे समाजकार्य महा.
नरखेड, जि. नागपूर
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:

केंद्र सरकारने 1 एप्रिल 2010 पासून 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009' लागू केला आहे. त्यानुसार 6 ते 14 वर्षे वयोगटातील सर्व मुलांचे प्रारंभीचे शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. त्याआधी म्हणजे सहा वर्षापर्यंतचा वयोगट मुलांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक जडणघडणीशी संबंधित असतो व राज्य सरकारांनी त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घ्यावी अशी अपेक्षा आहे, परंतु बालकांना मोफत व सक्तींच्या शिक्षणाचा हक्क मिळाल्यावरही शाळाबाह्य मुलांची संख्या खूप मोठी असल्याचे दिसते. ही बाब चिंताजनक आहे. शिवाय पूर्व प्राथमिक शिक्षणाविषयी अनेक राज्यांत विसंगती आहेत. पूर्वप्राथमिक शिक्षण शास्त्रीय पद्धतीने देण्याची गरज आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार कलम 4 अन्वये सहा वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही मुला–मुलीला शाळेत प्रवेश मिळेल किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या कोणत्याही मुला–मुलींना त्यांच्या वयानुसार इयत्तेत प्रवेश दिला जाईल. त्यांच्या वयास अनुरूप इयत्तेत प्रवेश दिला असला, तरी इतर मुला–मुलींच्या बरोबर अध्ययनपातळी गाठण्यासाठी विशेष शिक्षण ठराविक वेळेत, नमुद केल्याप्रमाणे मिळण्यासाठी एखाद्या मुलाने प्रवेश घेतला तरी 14 वर्षे वयानंतरही त्याला आठवीपर्यंत मोफत प्राथमिक शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. शाळेत न जाणारे बालक याचा अर्थ त्याने एकतर प्रवेश घेतलेला नसेल

किंवा ज्याने प्रवेश घेऊनही प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नसेल असे 6 ते 14 वयोगटातील बालक असा आहे. यात एका महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहणाऱ्या प्राथमिक शाळेतील बालकांचा समावेश होतो.

वयानुसार समकक्ष वर्गात प्रवेश घेणारे मूले 6 ते 8 पर्यंत समकक्ष वर्गात वयानुसार प्रवेश दिल्याने आपली अध्ययन पातळी इतर मुलांबरोबर प्रयत्नाने आणू शकेल. परंतु 9 ते 13 वयोगटातील मुलांना समकक्ष वर्गात प्रवेश देऊन त्यांची अध्ययन पातळी इतर मुलांबरोबर आणणे हे आज तरी शिक्षणाच्या सार्वत्रीकरणात अशक्य आहे. आजच्या औपचारिक शिक्षण पद्धतीत अशा मुलांना सामावून घेण्यात अउचणी आहेत. काही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर असे प्रयोग यशस्वी झालेले असतात. याचे सार्वत्रिकीकरण करतांना 'आदर्श मॉडेल' सर्वच ठिकाणी आदर्श परिस्थिती नसल्याने यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे 9 ते 13 या वयोगटासाठी पर्यायी शिक्षण म्हणून अनौपचारिक शिक्षण पद्धतीचाच अवलंब करावा लागेल. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986' मध्ये अनौपचारिक शिक्षण व औपचारिक शिक्षण याबद्दल तौलनिक चर्चा करून अनौपचारिक शिक्षणाची शिफारस केली आहे. औपचारिक शिक्षणाच्या चौकटीबाहेर मिळणारे संघटित शिक्षण म्हणजे अनौपचारिक शिक्षण. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून आर. व्ही. परूळेकरांसारख्या शिक्षणतज्ज्ञांनी त्याची गरज प्रतिपादन केली आहे. या अनौपचारिक शिक्षण घेणाऱ्या बालकांना वेगळया आणि निराळया पद्धतीने शिक्षण देण्याची गरज आहे. या मुलींना समकक्ष वर्गात प्रवेश दिल्याने तोच शिक्षक या मुलांना शिक्षण देण्या किती अग्रक्रम देईल या विषयी शंका आहे. यासाठी राज्याने वेगळा अभ्यासक्रम तयार केला आहे. पण त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होताना दिसन नाही. त्यामुळे शाळाबाह्य मुलांना समकक्ष वर्गात प्रवेश देऊन त्यांना आठवीपर्यंत नेता येईल. पण त्याची अध्ययन पातळी वर जाईल काय ? शिक्षणाच्या सार्वत्ररकरणात हे अशक्य आहे. काही ठिकाणी प्रयोग म्हणून यश मिळविणे वेगळे. सार्वत्रीकरणात कठीण, शाळाबाह्य मुले ही समस्याग्रस्त मुले आहेत. त्यांच्यासाठी पर्यायी शिक्षण व्यवस्थेची गरज आहेत. राष्ट्रीय पातळीवर ज्याप्रमाणे 'नॅशनल ओपन स्कूल' तातडीने सुरू करून शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाला गती दिली पाहिजे. अन्यथा, शाळाबाह्य मुलांचा प्रश्न सुटणे कठीण आणि

अशक्यही आहे. पटावरती मुले आहेत, पण त्यांची उपस्थिती नसते. यासाठी 'अनौपचारिक शिक्षण संचलनालय' कार्यक्षम बनवून त्याच माध्यमातून हा प्रश्न सुटू शकतो. बालमजूर कायदा असला तरी 9 ते 14 या वयोगटातील अनेक निराधार मुलांना काही तरी रोजगार करणे प्राप्त आहे. हा प्रश्नही सोडवावा लागेल.

शाळाबाह्य मुलांसाठी पर्यायी शिक्षण व्यवस्था निर्माण करून, अनौपचारिक शिक्षण पद्धत अवलंबल्यानेच 9 ते 14 वयोगटातील मुलांचा शिक्षणाचा प्रश्न सुटू शकेल. एखादी योजना सुरू केल्यावर वरिष्ठांना जसा अहवाल हवा आहे, तसा अहवाल तयार केला जातो. परंतु हे यश नसून अपयशच आहे. कारण आपणास शिक्षणातून सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणायचे आहे, तेव्हा वंचित समाजघटक हाच 'लक्ष्य गट' असला पाहिजे.

**संशोधनपद्धती :—**

कोणत्याही विषयाचे संशोधन वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून संशोधन पद्धतीचा अवलंब करून संशोधन केले जाते. प्रस्तुत शोधनिबंधासाठी "आव्हान शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाचे" या विषयांची निवड केलेली आहे.

**उद्देश :—**

१) शाळाबाह्य मुलांना मोफत व शक्तीचे शिक्षणाचा हक्क मिळणेबाबत अध्ययन करणे.

२) शाळाबाह्य मुलांना पर्यायी शिक्षणव्यवस्था निर्माण करून अनौपचारिक शिक्षण पद्धती अवलंबिण्याबाबत अध्ययन करणे.

३) शाळाबाह्य मुलांना सामाजिक, आर्थिक परिवर्तन या शिक्षणांचे ध्येयाबाबत अध्ययन करणे.

४) शाळाबाह्य मुलांना शिक्षणांच्या प्रवाहात आणण्याबाबत अभ्यास करणे.

**गृहितके :–**

१) शाळाबाह्य मुलांना मोफत व शक्तीचे शिक्षणाचा हक्क मिळवून देणे.

२) शाळाबाह्य मुलांना पर्यायी शिक्षणव्यवस्था निर्माण करून अनौपचारिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे.

३) शाळाबाह्य मुलांना सामाजिक, आर्थिक, परिवर्तन हे शिक्षणाचे ध्येय आहे.

४) शाळाबाह्य मुलांना शिक्षणांच्या प्रवाहात आणणे.

**नमुना निवड :–**

प्रस्तुत शोधनिबंधात गैर सभाव्यता नमुना निवड पद्धती सोईस्कर नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला.

संशोधनाचा **आराखडा :–**

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकानी अंशतः वर्णनात्मक व अंशतः निदानात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन :–**

प्रस्तुत शोधनिबंधात तथ्य संकलनामध्ये प्राथमिक स्त्रोतामधील मुलाखत अनुसूची व निरिक्षण या तंत्राचा वापर करून दुय्यम स्त्रोतामध्ये वर्तमान पत्रे, लोकार्पण, मासिके, योजना, पुस्तके, शासकीय बुकलेट, इत्यादी तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**भााळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण : 545 विद्यार्थ्यांची नोंद :–**

नागपूर महानगरपालिकातर्फे शनिवारी 4 जुलै रोजी शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाची मोहिम शहरात राबविण्यात आली. शोधमोहिमेतून 545 शाळाबाह्य बालकांची नोंद

करण्यात आली आहे. यात 81 अपंग बालकांचा तर रेल्वेस्थानकावर भटकंती असणारे तसेच जवळील झोपडपट्‌टीत वास्तव्य करणाऱ्या 33 बालकांचा समावेश आहे.

शाळाबाह्य बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनातर्फे अशा बालकांचे सर्वेक्षण करून त्यांना सक्तीचे शिक्षण दिले जाते. शहरात शोधमोहिमेतून सापडलेल्या 81 अपंग बालकांमध्ये कधीच शाळेत दाखला न घेतलेली 31 मुले तर 18 मुलींचा समावेश आहे. तसेच, शाळेत दाखला घेता. परंतु मध्येच शिक्षण सोडलेले 21 मुले व 11 मुलींचा समावेश आहे. सर्वेक्षणात 33 मुले रेल्वे स्थानकांवर सापडलीत. अपंग आणि रेल्वे स्थानकावरील बालकांना वगळता उर्वरित बालकांमध्ये 253 बालकांनी मध्येच शाळा सोडली. यात 204 मुले तर 74 मुलींचा समावेश आहे. शिवाय कधीच शाळेत न गेलेल्या बालकांची संख्या आहे. महापालिकेच्यावतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षण मोहिमेत 13 नियंत्रण अधिकारी, 205झोनल अधिकारी 4 हजार 847 सर्वेक्षण अधिकारी यांचा समावेश होता.

**नियमित शिक्षणाचे आव्हान :–**

शहरात हातमजूरी करणाऱ्या बालकांची संख्या सर्वेक्षणात जास्त असल्यामुळे या बालकांना नियमित शिक्षण देण्याच्या जबाबदारीत वाढ होत आहे.

कारण, रोजगारासाठी शहरात आलेले हे मजूर कधी परत जातील याचा काही नेम नाही. शिवाय पालकांना शिक्षणाचे महत्व माहिती नसल्यामुळे अशा बालकांना सांभाळण्याची व नियमित शिक्षण देण्याचे आव्हान शिक्षण विभागाला गेल्या काळात राहणार आहे.

**भाळाबाह्य मुलांची ठराविक वेळेत शिकवणी :–**

जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी सर्व शिक्षा अभियानाने एक हजार 263 मुलांच्या शिक्षणावर 39 लाखांच्या निधीची तरतूद केली आहे. सोमवारपासून या मुलांच्या शिक्षणाला सुरूवात झाली आहे. परंतु राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेने नेहमीच्या वर्गात व त्याच वेळेत या मुलांना शिक्षण द्यावयाचे असल्याने प्राथमिक शिक्षकांत याविषयी नाराजीचा सूर आहे.

सहा महिन्याच्या कालावधीत त्यांना समजेल, अशा पुस्तकातून शिक्षण द्यावयाचे आहे. पहिल्यांदांच मदरशामध्ये जाणाऱ्या मुलांनासुद्धा या शिक्षणाचा लाभ होणार आहे. प्रतिमहिना पाचशे रूपये प्राथमिक शाळेतील मुलांना सहा महिन्यांकरिता तर 232 रूपये मदरशात शिकणाऱ्या तीन महिन्यांसाठी शिक्षण देण्यात येणारे आहे. यासाठी केंद्र सरकारच्या 'पढे भारत, बढे भारत' व विद्यांजली योजनेअंगर्तत वाचता यावे, अशा पूरक योजनांचीही पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा निधी थेट जिल्हा शिक्षण विभागाकडून शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यात वळता होणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेच्या विद्या प्राधिकरणाने या मुलांकरिता विशेष पुस्तके बनविली आहे. ज्यामध्ये मुलांच्या वयानुरूप रंजक, चित्रमय आणि कमीतकमी आशय, भावपूर्ण अशी या पुस्तकांची रचना आहे. तसेच मुलांना पुरक वाचनाची सवय लागावी म्हणून द्विभाषीक पुस्तकांची निवड करून त्याची खरेदी स्थानिकस्तरावरून शाळांनी करण्याच्या सूचना आहेत. तशा स्वरूपाच्या जाहिराती वृत्तपत्रातून प्रकाशित करून शाळांनी खरेदी करावी म्हणून प्रकाशकांची यादी प्रकाशित करण्याच्या सूचना जि. प. च्या शिक्षण विभागाला आहेत. त्यामुळे ही शाळाबाह्य मुले या अभिनव उपक्रमातून तरी प्रवाहात येईल, अशी अपेक्षा शिक्षण विभागाला आहे.

**भाळाबाह्य बालकांची भाोधमोहिम :—**

शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्वांना शिक्षणाचा हक्क आहे. परंतु परिस्थितीनुरूप इतर विविध कारणामुळे अनेक बालके शिक्षणापासून वंचित राहतात. अर्थात, सर्वांना शिक्षण मिळावे, यासाठी महापालिका क्षेत्रातील शाळाबाह्य मुलांची शुक्रवार 15 जानेवारीपासून शोधमोहीम सुरू होणार आहे. 31 जानेवारीपर्यंत ही मोहीम सुरू राहील. यापूर्वी करण्यात आलेले सर्व्हेक्षण बोगस झाल्याचा आरोप करत संघर्ष वाहिनेने टाकलेल्या जनहित याचिकेवरील सुनावनीत उच्च न्यायालयाने सर्व्हेक्षण पुन्हा नव्याने घेण्याचे निर्देश राज्यशासनाला सुनावले होते. त्यानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शान निर्णयानुसार मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकांला आहे. त्यानुसार अशा

बालकांची शालेय पटावर नोंद करणे, नियमित शाळेत येणे व त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे इत्यादींचा समावेश आहे. जी बालके कधीच शाळेत गेली नाही, ज्यांनी शाळेत प्रवेश घेतलाच नाही किंवा प्रवेश घेतला परंतु शिक्षण पूर्ण केले नाही. अशा सर्व 6 ते 14 वयोगटातील बालकांचा यामध्ये समावेश होतो. शासनाच्या नियमांतर्गत अशा शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना सक्तीचे शिक्षण देण्यासाठी शोधमोहिम राबविली जात आहे. सर्व्हेक्षनांती बालकांना सक्तीचे शिक्षण देण्यात येईल.

## राज्यात दीड कोटी मुले शिक्षणापासून वंचित :–

शिक्षण हक्क अधिकार कायद्यानुसार राज्यातील 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी राज्यातील सरकारवर असतांना मागील पाच वर्षात शिक्षण विभागाला ही जबाबदारी नीट पार पाडतात आलेली नाही. त्यामुळे तब्बल 1 कोटी 44 लाख मुले शिक्षणापासून वंचित राहिल्याचे नुकतेच बाल हक्क आयोगाच्या एका सुनावणीदरम्यान समोर आले आहे.

याकरीता आयोगाने राज्य सरकार व महापालिका शिक्षण विभागावर ताशेरे ओढत मुलांच्या शिक्षणासाठी ठराविक मुलांच्या शिक्षणासाठी ठराविक वेळेत कार्यक्रम उआखण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्यांवर राज्य शिक्षण विभागाने अद्याप कोणतीही कार्यवाही सुरू केली नसल्याने शिक्षणापासून वंचित त्या मुलांच्या शिक्षण हक्कांचा प्रश्न अंधातरीच राहिला आहे. मुंबई शिक्षणकंपलीकरण विरोधी अभियानाचे कार्यकर्ते घनश्याम सोनार यांनी 'सर्व शिक्षा अभियान' आणि मनुष्यबळ विकास मंत्रालयाने जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात 1 कोटी 44 लाख मुले मागील पाच वर्षात आठवीपर्यंतच्या मोफत शिक्षणापासून वंचित राहिल्याची तक्रार राज्य बाल हक्क आयोगाकडे केली होती.

शिक्षण हक्क कायदा लागू असूनही आठवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी शिक्षण हक्काची पूर्तता करण्यात राज्य सरकारला अपयशी ठरल्याचे सोनार यांनी आपल्या तक्रारीत म्हटले होते. यावर सुनावणी करतांना आयोगाने राज्य शिक्षण विभाग व महापालिका शिक्षण

विभागाने कडक शब्दांत ताशेरे ओढले होते. राज्य सरकारकडून शिक्षण हक्क अधिकार कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा ठपका आयोगाने सरकारवर ठेवला होता.

**कायदा मोडणाऱ्या मुलांची संख्या वाढतेय :–**

विविध सामाजिक कारणांमुळे देशात कायदे मोडणाऱ्या मुलांची संख्या वाढत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळेच बाल सुधार गृहांमध्ये दरवर्षी अशा मुलांची गर्दी वाढते आहे. या मुलांच्या पुनर्वसनासाठी सरकार प्रयत्नशील असून बाल न्याय कायदा 2015 लागू करण्यात आला आहे.

महिला व बाल विकास मंत्री मेनका गांधी यांनी शुक्रवारी राज्यसभेत ही माहिती दिली. काँग्रेसचे खासदार विजय दर्डा यांनी विचारलेल्या प्रश्नाला त्या उत्तर देत होत्या.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीबारबी) आकडेवारीनुसार 2012 साली गंभीर गुन्ह्यांसह विविध गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आलेल्या मुलांची संख्या 39822 एवढी होती. 2013 मध्ये ती वाढून 43,506 झाली. तर 2014 साली हा आकडा 48230 वर पोहोचला. 2012 मध्ये 9677, 2013 ला 9549 आणि 2014 साली 8700 मुलांना निगरानी गृह आणि विशेष गृहांमध्ये पाठविण्यात आले आहे.

15 जानेवारी 2016 पासून बाल न्याय (बालकांची देखरेख आणि संरक्षण) कायदा 2015 लागू करण्यात आला आहे. परंतु अद्याप राज्यांनी त्याची अंमलबजावणी करायची आहे. नव्या कायद्याच्या कलम 41 अंतर्गत कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या मुलांसाठी असलेली गृहे आणि संस्थांना या कायद्याचे पालन न केल्यास दंड ठोठावला जाणार आहे. त्याचप्रमाणे कलम 53 नुसार या संस्थांमध्ये शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, मानसिक आरोग्याची काळजी आदी माध्यमाने मुलांच्या पुनर्वसनाची तरतूद करण्यात आली आहे. असेही गांधी यांनी सांगितले.

**उदरनिर्वाह भत्ता :–**

केंद्राद्वारे प्रायोजित सर्वकष बाल संरक्षण योजनेअंतर्गत 1 एप्रिल 2014 पासून वित्तीय मापदंडांमध्ये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार सुधारगृहांमधील मुलांच्या उदरनिर्वाह भत्त्यात मुलाप्रती दर महिन्याला 750 रूपयांवरून 2000 रूपये एवढी वाढ करण्यात आली आहे.

**भाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी हजाराचे बक्षीस :–**

अन्न, वस्त्र व निवाऱ्याबरोबरच शिक्षण ही देखील नागरिकांची मूलभूत गरज आहे. ती पूर्ण होणे गरजेचे असते. शिक्षणाने समाजात सुधारणा तर होतेच, शिवाय प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू होते. मात्र, देशाला स्वातंत्र्य मिळून 62 वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही शिक्षण सर्वदूर पोहोचल्याचे दिसत नाही. त्यामुळे शाळाबाह्य मुलांची संख्या म्हणाव्या त्या प्रमाणात कमी झालेली नाही. या मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, या उद्देशाने शिक्षण हक्काचा कायदा करण्यात आला. त्यानुसार 6 ते 14 वर्षापर्यंत मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले. पण, आपल्या देशात कायद्याचे पालन करण्याऐवजी या ना त्या कारणाने किंवा पळवाटा काढून कायद्याचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न अधिक प्रमाणात होतांना दिसतो. त्यामुळे कायदा झाला पण, सगळयांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळू लागले नसल्याचे अजूनही कायम असलेल्या शाळाबाह्य मुलांच्या प्रमाणावरून स्पष्ट होते. शाळाबाह्य सर्वेक्षणात आलेल्या अपयशाचे खापर एकीकडे अधिकाऱ्यांच्या माथ्यावर फुटत असतांनाच वारंवार होणाऱ्या सर्वेक्षणात शासनाच्या तिजोरीवरील ताण वाढतांना दिसत आहे. शासन एका शाळाबाह्य विद्यार्थ्याला शोधण्यासाठी 1 हजार रूपयांचे बक्षीस देण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. मात्र या प्रकाराने खरोखरंच शाळाबाह्य मुले शाळेत येतील की पैशांच्या हव्यासापोटी बोगस विद्यार्थ्यांचा भरणा करण्यात येईल. हे समजायला मार्ग नाही.

**निष्कर्श :–**

देशातील गोरगरिबांच्या तळागळातील घटकांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, हा शिक्षण कायद्याचा मुख्य उद्देश आहे. कारण या घटकांतील मुले त्या कारणाने शालेय शिक्षणापासून वंचित आहेत. अशा कुटूंबातील मुले शाळा बाजूला ठेवून काम करतांना आढळतात. हॉटेल्स, किरकोळ विक्रीची दुकाने याकडे नजर टाकली तरी तेथे मुले काम करतांना आढळतात. साहजिक या घटकातील शाळाबाह्य मुलांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे केवळ शिक्षण हक्काचा कायदा हा प्रश्न सुटेल, असे म्हणता येणार नाही. या शिवाय देशात बालमजूरांचे प्रमाणही लक्षणीय असून त्यामागेही दारिद्रय हेच कारण आहे. घरची अत्यंत गरिबी असेल तर पैशासाठी मुलांनाही काम करणे भाग पडते. अशा पद्धतीने इच्छा असो वा नसो, काम करावे लागणाऱ्यांची संख्या कमी नाही. बालमजूरी थांबविण्यासाठी कायसुद्धा करण्यात आला. परंतु त्याचीही योग्यपणे अंमलबजावणी होत नसलचे दिसते. त्यामुळे बालमजूरांच्या संख्येला फारसा आळा घालता आला नाही. शिक्षण हक्क कायद्याचा लाभ या बालमजुरांना मिळातो का हा प्रश्न कायम राहता.

शिक्षण हक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हायची असेल तर मुलांमध्ये शैक्षणिक वातावरण तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी शाळांची अवस्था चांगली असणे गरजेचे आहे. मात्र, आज देशातील सरकारी शाळांची अवस्था बिकट आहे. अनेक शाळेत पिण्याच्या पाण्याची, बसण्याची तसेच स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नाही. सद्यास्थितीत शेतातील कामासाठी मंजूर मिळणे अवघड झाले आहे. अशावेळी काही कामे पार पाडण्याची वेळ मुलांवर येते. शिवाय शिकून काय करायचे, शिकून कोणाचेकल्याण झाले आहे. अशी अनेक शेतमजूर पालकांची मानसिकता आढळते. त्यामुळे ते पालकच मुलांच्या शिकण्याबाबत उत्सुक नसतात. यामुळे शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांचे शैक्षणिक भवितव्य बर्बाद होते. त्याचप्रमाणे या ना त्या कारणाने सतत होणारे स्थलांतर आणि त्याचे वाढते प्रमाण हे सुद्धा मुलांच्या शिक्षणातील अडसर ठरत आहे. हल्ली कंत्राटी कामगारांची संख्या वाढत आहे. हे

लोक एका ठिकाणचे कंत्राट संपले की कुटुंबासह अन्यत्र कामाला जातात. त्यामुळे एका ठिकाणी स्थायिक होऊन किंवा काही वर्ष राहून मुलांना शिक्षण देणे त्यांना शक्य होत नाही.

राज्यातील प्रत्येक मूल शिकले पाहिजे तसेच शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विभागाने विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास व्हावा यासाठी विविध उपक्रम राबविले. याशिवाय शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आणण्यासाठी राज्यव्यापी सर्वेक्षणाचे दोन टप्पे पार पडले. मात्र, पाहिजे त्या प्रमाणात शाळाबाह्य मुले सापडली नसल्याची बोंब होतांना दिसून येते. सर्वेक्षणाच्या अपयशाचे खापर अधिकाऱ्यांच्या माथ्यावर फोडतांना दिसून येते. सर्वेक्षण दुसऱ्यांदा फसल्याने आता पैशांचे आमिष देत, शाळाबाह्य मुले शाळेत आणण्याचा मानस शिक्षण विभागाचा आहे. त्यासाठी प्रति विद्यार्थी एक हजार रूपये देण्याची शासनाची तयारी आहे. मात्र, शासनाच्या त्या निर्णयाविरूद्ध सामाजिक संघटनांनी आक्षेप घेऊन पैश्यांपोटी योग्य विद्यार्थी येण्यापेक्षा बोगस विद्यार्थ्यांचाच भरणा अधिक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे भ्रष्टाचारालाच वाव मिळेल, असे मतही व्यक्त होत आहे. यापुर्वीच बोगस पटसंख्या नोंदवून अनेक शाळांनी अनुदान लाटले आहेत. त्यामुळे शाळाबाह्य सर्वेक्षणासाठी शाळा, शिक्षण आणि स्वयंसेवी संस्थाना विश्वासात घेणे आवश्यक असल्याचे मत शिक्षक भारतीने व्यक्त केले आहे.

## संदर्भः

1) बोधनकर/अलोणी ''सामाजिक संशोधन पद्धती'' साईनाथ प्रकाशन, नागपूर

2) डॉ. प्रदिप आगलावे ''सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे'' साईनाथ प्रकाशन, नागपूर

3) लोकशाही वार्ता दि. 21/08/2016 , पेज नं. 02, ''आव्हान शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाचे''

4) लोकशाही वार्ता दि. 08/08/2016 , पेज नं. 11, 'शाळाबाह्य मुलांची ठराविक वेळेत शिक्षण घ्या''

5) लोकशाही वार्ता दि. 14/01/2016 , पेज नं. 13, 'शाळाबाह्य बालकांची शोध मोहीम''

6) लोकशाही वार्ता दि. 07/07/2016 , पेज नं. 16, 'शाळाबाह्य बालकांचे सर्व्हेक्षण''

7) लोकशाही वार्ता दि. 15/01/2015 , पेज नं. 08, ''राज्यारत दिड कोटी मुले शिक्षणापासून वंचित''

8) लोकशाही वार्ता दि. 22/02/2015 , पेज नं. 04, ''शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी हजारांचे बक्षीस''

9) लोकशाही वार्ता दि. 30/07/2016 , पेज नं. 05 ''प्रश्न शाळाबाहेर का पडतात''

10) लोकमत दि. 07/05/2016, पेज नं. कायदा मोडणाऱ्या मुलांची संख्या''

11) लोकशाही वार्ता दि. 04/11/2015, पेज नं. 04, ''मुळ निवासी समाज व शिक्षण''